दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०९ एप्रिल २०२५

**||सुविचार||**

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे. जे तुमच्याशी वाईट वागतात, त्यांच्याशीही प्रेमानच वागल पाहिजे,
**ते चांगले आहेत म्हणून नाही,**
**तर तुम्ही चांगले आहात म्हणून.**




# पुणे मनपाचा मंगेशकर रुग्णालयाला दणका !
## २ दिवसात २२ कोटी भरा नाही तर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, पुणे :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला आता पुणे महानगर पालिकेने मोठा दणका दिला आहे. तनिषा भिसे या तरुणीचा मृत्यू झाल्यानंतर मंगेशकर रुग्णालयाचे एक एक कारनामे समोर येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे मंगेशकर रुग्णालयाने पुणे महापालिकेचा तब्बल २७ कोटींचा कर थकवला आहे. आता पुणे महापालिकेने रुग्णालय प्रशासनाला एक नोटीस पाठवली आहे. त्यात त्यांनी २ दिवसात २२ कोटींचा कर भरण्याचा आदेश मंगेशकर रुग्णालयाला दिला आहे. जर हा कर भरला नाही तर जप्तीची कारवाई करण्यात येईल असं ही सांगण्यात आलं आहे. पुणे मनपाने ही नोटीस लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या व्यवस्थापकांना पाठवली आहे. लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशन या मिळकतीच्या थकबाकीबाबत ही नोटीस बजावण्यात आली आहे.



त्यात सदर मिळकतीची सन २०२४-२०२५ अखेर थकबाकी रक्कम रु.२७,३८,६२,८७४ इतकी आहे. असं या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. शिवाय सन २०१६-१७ रोजी मिळकतीची करण्यात आलेली कर आकारणी आपणास मान्य नसल्याने पुणे महानगरपालिका विरुद्ध आपण दावा दाखल केलेला होता. असं ही या नोटीसमध्ये म्हटले आहे.

या दाव्याबाबत उच्च न्यायालयाने मिळकत करात समाविष्ट असलेल्या जनरल टॅक्सच्या ५० % रक्कम शिवाय उर्वरित इतर कर भरण्याबाबत कोर्टाने आदेश दिले आहेत. त्यानुसार आपणाकडे सन २०१४ ते सन २०२५ अखेर २२,०६,७६,०८१ इतकी थकबाकी कोर्ट आदेशानुसार दिसून येत आहे, असं ही या नोटीसमध्ये सांगण्यात आलं आहे. थकबाकीबाबत महापालिका आयुक्त यांच्या दालनात बैठक झाली आहे. त्यात अतिरिक्त महापालिका आयुक्त मिळकतीच्या थकबाकीबाबत व कोर्ट आदेशानुसार मिळकतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ४२ चे तरतुदीनुसार जप्तीची कारवाई करणेबाबत तोंडी आदेश दिले आहेत. असं या नोटीसमध्ये म्हटलं आहे.

त्यामुळे मंगेशकर रुग्णालयाची आता चारही बाजूने कोंडी झाल्याचे चित्र आहे. आता पुढील दोन दिवसात थकबाकी पोटी असलेली २२ कोटींची रक्कम रुग्णालयाला भरावी लागेल. अशा स्थितीत रुग्णालय प्रशासन आणि ट्रस्ट काय निर्णय घेतं या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तनिषा भिसे ही तरुणी प्रसुतीसाठी मंगेशकर रुग्णालयात आली होती. मात्र तिच्या कुटुंबीयांकडे दहा लाखाचे डिपॉझिट मागण्यात आले. त्यावरून तनिषाला ॲडमिट करण्यात उशीर झाला. पुढे तिचा मृत्यू झाला. त्यानंतर मंगेशकर रुग्णालयाबाबत संताप व्यक्त केला जात होता.

# थोडक्यात

## पुण्यातील प्रकरण ताजं असताना कल्याणही हादरलं



**दि.०७, कल्याण :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तनिषा भिसे मृत्यू प्रकरण ताजं असताना कल्याणमधून असाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केडीएमसीच्या (कल्याण डोंबिवली महानगरपालिका) रुग्णालयात एका महिलेचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. रुग्णालयात उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू झाला.

कल्याण पूर्वेतील शक्तिधाम रुग्णालयात शांतीदेवी मोरया या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. याबाबत केडीएमसीच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी दीपा शुक्ला यांनी माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शांतीदेवी या महिलेला कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. शस्त्रक्रिया करण्यापूर्वीची औषधंही त्यांना देण्यात आली होती. मात्र अचानक त्यांची प्रकृती खालावल्याने डॉक्टर या महिलेला दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट करणार होते. यादरम्यान महिलेचा मृत्यू झाला. केडीएमसी हद्दीत महापालिकेच्या तीन प्रसुतीगृहाची रुग्णालयं आहेत. त्यातील एकाही रुग्णालयात आयसीयूची व्यवस्था नाही, अशी माहिती आहे.

## उन्हाळ्यात सावधान ! पुरेसं पाणी प्या, अन्यथा...



**दि.०८, नागपुर :** उन्हाचा प्रकोप सध्या वाढत आहे. तापमानामध्ये सातत्यानं वाढ होत असताना एक धोक्याचा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. उन्हाळ्यात पुरेसे पाणी पिण्याची सावधगिरी बाळगली नाही तर मेंदूला जीवघेणी गाठ होऊ शकते. होय, हे खरे आहे. उन्हाळ्यात सीवीएसटीचा धोका वाढला असून दुर्मिळ सीवी एसटीचे रुग्ण आढळून येत आहेत. नागपुरात असाच एक रुग्ण आढळला आहे.

**काय आहे प्रकरण ?**

वोकहार्ट रुग्णालयाचे न्यूरोलॉजिस्ट डॉ अमित भट्टी यांनी 'छ्रृढत मराठी' ला दिलेल्या एक्सक्लुझिव्ह माहितीनुसार, हा रुग्ण मार्केटिंग क्षेत्रातील असून त्याला सतत फिरतीवर राहणे आवश्यक आहे. अशावेळी, स्वतःच्या प्रकृतीकडे, वेळेवर पाणी पिणे याकडे लक्ष देणे कठीण होत असे. त्यामुळे त्याला डोकेदुखी, फिट्स येणे आणि अर्धे शरीर लकव्याप्रमाणे इत्यादी लक्षणे दिसू लागली.

त्याला रुग्णालयात दाखल करून चाचण्या घेतल्या नंतर कोर्टिगल व्हेनस सायनस थ्रॉम्बॉयसिस झाल्याचे निदान आले. याचा अर्थ मेंदूच्या व्हेनमध्ये रक्त साचून क्लॉट झाल्याने फिट्स तर येत होतेच शिवाय त्यांना तिथे रक्तस्त्राव होऊन अर्धांगवायू देखील झाला होता. त्याला बोलणंही अवघड झाले होते.

सामान्यतः अशा रुग्णांच्या क्लॉट ला गोळ्या औषधाने विरघळण्याचा प्रयत्न केला जातो आणि ९० ते ९५ टक्के रुग्णांमध्ये तो यशस्वी होतो देखील. मात्र या रुग्णात औषधांना गुण येत नव्हता. फिट्स इतक्या वाढल्या होत्या की जिवाला धोका निर्माण झाला होता. या स्थितीला वैद्यकीय भाषेत स्टेटस एपिलेप्टिकस म्हणतो. क्लॉट मुळे जे रक्त मेंदूतून हृदयात परत यायला हवे ते येत नव्हते उलट तिथे रक्तस्त्राव होऊन त्यांना ब्रेन हॅमरेज झाला होता.

त्यामुळे, आम्ही अधिक वेळ ना घालवता मेकॅनिकल थ्रॉम्बोक्टॉमी केले म्हणजे, त्याच्या पायाच्या व्हेन मधून मेंदूच्या व्हेन मध्ये प्रवेश केला आणि तो ब्लोकेज उघडला. त्यामुळे रुग्णाचे फिट्स पूर्णपणे बंद झाले. चोवीस ते अठ्ठेचाळीस तासात त्यांचा अर्धांगवायू पूर्णपणे बरा झाला आणि त्यांची वाचा पूर्णपणे बरी होऊन ते बोलू लागले.

भट्टी यांनी पुढं सांगितलं की, या पेशंटला त्याच्या नोकरीमुळे एका गावातून दुसऱ्या गावात दुचाकी वाहनाने खूप जास्त प्रवास करणे अनिवार्य होते. या कामाच्या नादात त्याचे पाणी पाण्याकडे दुर्लक्ष होत होते. तापमानामुळे पाण्याचे प्रमाण आणखी कमी होऊन ते अधिक डीहायड्रेट झाले. यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला. म्हणून, उन्हाळ्यात भरपूर पाणी पिणे,मिठाचे प्रमाण योग्य ठेवणे, धूम्रपान किंवा अल्कोहोल न घेणे आवश्यक आहे. कारण, त्याने डी हायड्रेशन आणखी वाढते. सातत्याने वाढणारी डोके दुखी असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यानंतर मिरगीचे दौरे, फिट्स किंवा अर्धांगवायू होऊ शकतो.

# पारनेर तालुक्याला पाणीटंचाईचे चटके ! जिल्हाधिकाऱ्यांकडे ११ गावांचे टँकर मंजुरीचे प्रस्ताव

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र होत चालली आहे. सध्या तालुक्यातील १९ गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, यापैकी ११ गावांचे टँकर मागणीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहेत.

उर्वरित सात गावांचे प्रस्ताव नुकतेच प्राप्त झाले असून, त्या गावांतील पाण्याच्या सध्याच्या परिस्थितीची पाहणी करून गरजेनुसार हे प्रस्तावही जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवले जाणार आहेत. सध्या तालुक्यात एकही टँकर सुरू नसला तरी, एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच १९ गावांमध्ये पाणीटंचाई जाणवू लागली आहे. यापैकी बाभुळवाडे, मुंगशी, जामगाव, काताळवेढे, विरोली, कान्हूर पठार, पिंप्री पठार, वेसदरे, करंदी आणि सारोळा आडवाई या ११ गावांचे टँकर मागणीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात आले आहेत.



**अशी आहे स्थिती !**

पारनेर तालुक्यातील बाभुळवडे,विरोली, कान्हुरपठार, पिंपरी पठार,वेसदरे, करंदी व सारोळा अडवाई या गावांना दोन दिवसांत टँकर सुरू होण्याची शक्यता आहे. याशिवाय तालुक्यातील हत्तलखिंडी, वडनेर हवेली, किन्ही, पळशी, पिंपळगाव तुर्क, म्हसोबा झाप आणि पिंपळगाव रोठे या सात गावांचे टँकर मागणीचे प्रस्ताव पारनेर पंचायत समितीकडे नव्याने प्राप्त झाले आहेत. या गावांतील पाण्याच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून गरज भासल्यास हे प्रस्तावही मंजुरीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवले जाणार आहेत. तालुक्यातील बहुतांश गावांतील विहिरी आणि तलावांनी तळ गाठला असून, कूपनलिकाही कोरड्या पडू लागल्या आहेत.

**पाण्याचा अनाधिकृत उपसा बंद करा !**

पठार भागातील टँकर भरण्यासाठी मांडओहळ धरण हा मुख्य स्रोत वापरला जाणार आहे. मात्र, या धरणातील पाण्याची पातळीही खालावत चालली आहे.

शेतकऱ्यांनी अनधिकृतपणे पाण्याचा उपसा केला नाही, तर हे पाणी किमान दोन ते अडीच महिने टँकर भरण्यासाठी पुरेल,असा अंदाज आहे. याशिवाय,कोहकडी आणि शिरापूर येथिल उद्धवही गरजेनुसार टँकर भरण्यासाठी वापरले जाणार आहेत.

**१ कोटी ३० लाखांचा आराखडा**

गतवर्षीच्या पाण्याच्या टंचाई लक्षात घेऊन ४० गावे ३२० वाड्यांना टंचाईचा धोका लक्षात घेऊन तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी पारनेर तालुक्यातील पाणीटंचाईचा आराखडा जिल्हा परिषदेकडे सादर केला आहे. त्यात आगामी काळात सुमारे ४० गावे आणि ३२० वाड्या वस्त्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो,असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे १ कोटी ३० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

# पालकमंत्र्यांनी घेतला पाणीटंचाई निवारनार्थ उपाययोजनांचा आढावा...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, बुलडाणा :** जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारनार्थ उपाययोजनांचा मंगळवार, दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात झालेल्या या प्रशासकीय विभागांच्या आढावा बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांचेसह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी या बैठकीत जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान, सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा, पाणी टंचाई निवारनार्थ कृती आराखडा, जनावरांसाठी चारापाणी, विहीर अधिग्रहण, जलसंधारणाचे काम, सिमेंट बंधारे बांधकाम, भूजल पाणी पातळी, राष्ट्रीय पेयजल योजना, टँकरने पाणी पुरवठा, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, नळ जोडणी, हर घर जल, जलजीवन मिशन, खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी धोत्रा नंदई व इतर १४ गावांना पाणी उपलब्ध करणे यासह विविध विषयांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणीसाठ्याचे नियोजन करावे, पिण्याचे पाणी नियोजनावर विशेष लक्ष द्यावे, दरवर्षी टंचाई असलेल्या गावांना जलसंधारणाच्या कामांमध्ये प्राधान्य द्यावे, टँकर सुरू असलेल्या गावांमध्ये बोअरवेलचे काम काम पूर्ण करावे. पाणी पुरवठा योजना ताबडतोब पूर्ण कराव्यात. जलजीवन मिशनच्या कामांचा दर्जा राखला जाईल याची दक्षता घ्यावी. या कामांची नियमित तपासणी करावी. जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध करुन द्यावा, पाणीपुरवठा विभागाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करावी, असे निर्देश पालकमंत्री ना.पाटील यांनी प्रशासनाला दिले.



**'त्या' १४ गावांना पाणी मिळणार...**

राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कारप्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी २४ मार्च रोजी आत्महत्या केली होती. या घटनेची राज्य शासनाने गंभीर दखल घेत त्यानुषंगाने पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. या बैठकीत खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी धोत्रा नंदई व इतर १४ गावांना बंदिस्त पाईपलाईनद्वारे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. यात अंढेरा, वाकी बु, वाकी खु, सेवानगर, पिंप्री आंधळे, शिवनी अरमाळ, नागणगाव, पाडळी शिंदे, मेंडगाव, बायगाव, सावखेड नागरे, वाघाळा आणि खैरव या गावांना खडकपूर्णाचे १६६० हे सिंचन क्षेत्रासाठीचे पाणी देण्याचा ७० कोटींचा प्रस्ताव नियामक मंडळाकडे पाठविण्यात आला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांच्याशी चर्चा केली आहे. लवकरच या प्रस्तावाला मान्यता मिळवून १४ गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्री ना.पाटील यांनी यावेळी सांगितले.कै. कैलास नागरे यांच्या आत्महत्येला बलिदानाचा दर्जा देण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा असून या मागणीविषयी त्यांना माहिती देणार आहे. कै. नागरे यांच्या वारसांचे पालकत्व शासनाने स्वीकारले आहे. तसेच त्यांच्या पत्नीला नौकरी देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्र्यांनी हा पाणी प्रश्न सोडल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी, गावकरी यांच्याकडून समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता राहुल जाधव यांनी पाणी टंचाई निवारनार्थ उपाययोजनाची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# संपादकीय



## कोकणी भाषा




आज ९ एप्रिल आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. प्रख्यात कोकणी कार्यकर्ते शेनाई गोंबेब यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. कोकणी भाषेला प्रोत्साहन देणे आणि तिची प्रतिष्ठा वाढवणे, कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार करणे हे मुख्य उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहे. या दिवशी कोकणी भाषेतील लेखकांचा आणि कलाकारांचा गौरव केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे. गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणी ही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाका असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे. कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील जेष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००८ साली तर दामोदर मावजो यांना २०२१ साली मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा.

# शिक्षण बदलतंय !

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडत आहेत. भारतातील आणि जगभरातील शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाच्या अनेक व्याख्या मांडलेल्या आहेत. शिक्षण ही एक बहुआयामी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून अनेक गोष्टी साध्य होतात ˉ व्यक्तिमत्त्वाचा विकास, रोजगाराची संधी, साक्षरता, शहाणपण, कौशल्यांची प्राप्ती, सुजाण नागरिकांची निर्मिती, चारित्र्य घडवणं, माणुसकी वाढवणं आणि संवेदनशीलतेचा विकास. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या हक्कांची आणि कर्तव्यांची जाणीव होते.



शिक्षण हे वाघिणीच्या दुधासारखं आहे ˉ ते ज्याने प्यालं, तो नक्कीच गुरगुरतो! म्हणजेच, शिक्षणातून स्वाभिमान, आत्मबल, धाडस आणि विवेकी दृष्टिकोन विकसित होतो. शिक्षणाच्या बाबतीत असे अनेक विविध दृष्टिकोन आढळतात.

NEP 2020 मध्ये शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे मांडली आहे ˉ शिक्षण हे बाह्य शिक्षणाबरोबरच अंतरिक शिक्षणातही सहाय्यभूत असावं. या व्याख्येतून अनेक अर्थ स्पष्ट होतात.

समाजात अनेकदा म्हटलं जातं की, शिकलेले निव्वळ हुकलेले असतात! असं का म्हणावं लागतं, याचा विचार केला असता लक्षात येतं की, काही शिक्षित व्यक्ती फक्त पुस्तकी ज्ञानात अडकलेल्या असतात. पुस्तकी माहितीचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करताना अशा व्यक्तींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

बी.कॉम. किंवा एम.कॉम. झालेल्या व्यक्तींना साधी बँकेची स्लिप भरता येत नाही, विज्ञान शाखेतील पदवीधर हातात गंडेदोरे घालून फिरताना दिसतात. मोठमोठे आर्थिक घोटाळे, भ्रष्टाचार करणारे, वाहतुकीचे नियम मोडणारे, पर्यावरणाचा ऱ्हास करणारे, सार्वजनिक ठिकाणी घाण करणारे ˉ हे सर्वदेखील शिकलेलेच असतात. जर शिक्षणातून सुजाण नागरिक घडत नसतील, तर शिक्षण व्यवस्थेत बदल होणे अत्यावश्यक ठरते.

आता शिक्षणाच्या नव्या दृष्टीकोनात अंतरिक शिक्षणावर भर दिला जात आहे. अंतरिक शिक्षणामध्ये मानवता, मूल्य, नीतिमत्ता, संवेदनशीलता, अंतरिक विकास (पंचकोश संकल्पना) आणि भारतीयतेचा समावेश केला गेला आहे.

मानवता म्हणजे आत्मज्ञानाची सुरुवात.

मूल्यशिक्षण म्हणजे योग्य-अयोग्य यामधील निवड करण्याची क्षमता.

नीतिमत्ता म्हणजे विचार, शब्द आणि कृती यांमध्ये समरसता ठेवून आदर्श मूल्य अंगीकारणे.

आज समाजात नीतिमत्तेची मोठी उणीव आहे.

संवेदनशीलता म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाशी समरस होण्याची क्षमता. आज हिंसक आणि क्रूर प्रवृत्ती वाढत आहेत. दुसऱ्याच्या वेदनेत आनंद मानणारेही समाजात निर्माण होत आहेत. त्यामुळे संवेदनशील विद्यार्थी घडवण्याची गरज निर्माण झाली आहे.आनंद आणि खऱ्या सुखाची व्याख्या शिक्षणातून समजावली जाणार आहे.

अंतरिक विकासाच्या पंचकोश संकल्पनेनुसार मानवाच्या आजूबाजूला पाच प्रकारची आवरणं असतात:-अन्नमय कोश – शारीरिक विकास, प्राणमय कोश – जीवनशक्ती,मनोमय कोश – मनाचा विकास,विज्ञानमय कोश – बौद्धिक विकास, आनंदमय कोश – आत्मिक समाधान,या पाच कोशांच्या संगोपनावर शिक्षणातून भर दिला जाणार आहे. भारतीय विचारधारा आणि मूल्यांचं शिक्षणात पुनःस्थापन केलं जात आहे.

शिक्षण ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यात सतत नवीन विचारप्रवाह जोडले जातात आणि उत्तरोत्तर उत्कृष्ट नागरिक घडवण्याचं काम शिक्षण करतं.

महात्मा गांधींनी सांगितल्यानुसार, शिक्षण हे असावं जे शरीराला श्रमांकडे, बुद्धीला मननांकडे आणि हृदयाला भावना व सहवेदनांकडे वळवतं.

याच दिशेने शिक्षणप्रणाली आता पुढे जात आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## पाचोरे येथे ड्रायव्हिंग लायसन्स कॅम्पचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.८, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील पाचोरे खुर्द येथे खंडेराव महाराज यात्रा उत्सव निमित्त निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या आदेशाने व वाहतुक संघटनेचे अध्यक्ष योगेश कायस्थ यांच्या मार्गदर्शनाखाली ड्रायव्हिंग लायसन्स कॅम्पचे नियोजन करण्यात आले होते. राज्यात विविध ठिकाणी यात्रांच नियोजन करण्यात येत असते, मात्र ह्या यात्रांमध्ये फक्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते, मात्र पाचोरे खु. येथील यात्रेत नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केल्याने पंचक्रोशीत सदर कार्यक्रमाचे कौतुक होत असताना दिसत आहे. ग्रामीण भागातील बहुतांश वाहण चालकांकडे सोयी अभावी लायसन्स नसते, त्यामुळे सदर लायसन्स कॅम्प मुळे ग्रामीण भागातील मोठी गैरसोय टळल्याची भावणा आहे. पाचोरे खुर्द येथील खंडेराव महाराज यात्रोत्सवानिमित्त पत्रकार ज्ञानेश्वर सांगळे हे बारा गाड्यांचे मानकरी होते. त्यांच्या कल्पनेतुन हा उपक्रम नावारुपाला आला आहे. सदर ड्रायव्हिंग लायसन कॅम्प हा राज्यातील यात्रांतील पहिला उपक्रम असल्याचे आयोजक अरुण थोरे यांनी सांगितले, सदर उपक्रमासाठी पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असुन, पुढील सहा दिवसांत ज्यांना ही कुणाला लायसन्स काढायचे त्यांनी लवकरात लवकर आपले लायसन्स काढुन घ्यावे असे आव्हान आयोजकांच्या वतीने केले आहे.

## खरे साधू..

विकारावर विजय
तेचि खरे अरिहंत
अहिंसासंयम राखे
त्यांना मानावे संत

माया मोह मत्सर
रोग मुक्ती असाध्य
इंद्रियांवरी अंकुश
म्हणा तया उपाध्य

विविध विषय ज्ञान
असते ज्यांस जाण
स्वता करे आचरण
तेचि आचार्य जाण

मिथ्याचमत्कार करे
चलाख विचीत्र भोंदू
ज्ञान सदुपयोग करी
मार्गदर्शक होई साधू

कथन करी रामदास
सार्थ सज्जन लक्षण
दुष्ट प्रवृत्ती नसानसा
दुर्जनांचे अव लक्षण

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# संगीत रंगभूमीचे वैभवः अशोक परांजपे

अशोक गणेश परांजपे हे पट्टीचे मराठी गीतकार होते. ते मुंबई येथे महाराष्ट्र राज्य लोककला संचालनालयाचे संचालक होते. त्यानंतर ते औरंगाबादला स्थायिक झाले होते. त्यांनी भक्तिगीत, भावगीत, अंगाईगीत, लावणी, गण-गवळण आणि नाट्यगीत या प्रकारची गीते लिहिली. इंडियन नॅशनल थिएटर- आयएनटी रिसर्च सेंटरचे त्यांचे काम सुरू असताना त्यांनी महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये जाऊन तेथील लोक कलावंतांच्या लोककलेच्या ध्वनिफिती तयार केल्या. त्या संदर्भात परांजपेंनी सन १९९२मध्ये पंढरपूर भक्तिसंगीत महोत्सव आणि १९८६मध्ये आनंदवन येथील महाराष्ट्र आदिवासी कला महोत्सव, असे दोन महोत्सव आयोजित केले. या कामाची नोंद फोर्ड फाउंडेशनने घेतली. ऑस्ट्रियातील इन्स्टिट्यूट ऑफ व्हिडिओग्राफी-आयओव्ही या आंतरराष्ट्रीय लोककला संस्थेने त्यांना सभासदत्व दिले. त्यानंतर त्यांनी अनेक मराठी कलावंतांना फ्रान्स, आयर्लंड, जपान आदी देशांत नेऊन तेथे त्यांना कला सादर करण्याची संधी मिळवून दिली.

अशोक गणेश परांजपे हे महाराष्ट्रातील लोककला संशोधक, गीतकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म दि.३० मार्च १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील हरिपूर येथे झाला. त्यांचे वडील गणेश परांजपे हे आयुर्वेदाचार्य होते. हरिपूर ही भूमी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या नावाने ओळखली जाते. त्यांचे ग्रामसंस्कृतीशी अतूट नाते होते. शालेय जीवनापासूनच त्यांना सांगली परिसरातील लोककलांचे विलक्षण आकर्षण वाटू लागले. शाहीर आनंदराव सूर्यवंशी, शाहीर बापूराव विभूते, तमाशा कलावंत शंकर तात्या सावजळकर, काळू-बाळू अशा लोककलावंतांशी त्यांचा सततचा संपर्क होता. शाहिरी, सोंगी भारुड दत्तपंथी भजन, तमाशा, तलवार, दांडपट्टा, करपल्लवी या लोककला सांगली परिसरात लोकप्रिय होत्या. त्या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. लेखन, वाचन, चित्रकारी सोबतच कुस्तीची त्यांना आवड होती. मुंबईत आल्यावर जे.जे.स्कुल ऑफ आर्टमध्ये त्यांनी चित्रकलेचे धडे घेतले.

दि.१० ऑक्टोबर १९७८ रोजी इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्राची स्थापना वगसम्राट दादू इंदुरीकर यांच्या हस्ते झाली. या संशोधन केंद्राचे संचालक म्हणून अशोकजींनी



जबाबदारी स्वीकारली. तसेच ही जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पारही पाडली. सन १९८६ साली इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्रातर्फे आनंदवन वरोरा येथे आदिवासी महोत्सवाचे आयोजन त्यांच्या संकल्पनेतून झाले होते. ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी या आदिवासी महोत्सवाचे मार्गदर्शक होते. दामू झवेरी, कपिला वात्सायन, दुर्गा भागवत आदी मान्यवर या महोत्सवाला उपस्थित होते. सन १९९२मध्ये पंढरपूर येथे भक्तीसंगीत महोत्सवाचे आयोजन त्यांच्याच संयोजनाने झाले होते. फ्रान्स, आयलंड, जपान आदी देशांत महाराष्ट्रातील लोककलांची पथके नेवून तेथे मार्गदर्शन केले. खंडोबाचे जागरण, देवीचा गोंधळ, कोकणातील दशावतार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या कला, पारंपरिक तमाशा, कीर्तन, लळीत अशा लोककलांच्या जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्यांनी आयएनटीच्या लोक प्रायोज्य कलेच्या संशोधन विभागाचे संचालक असताना कार्य केले. आयएनटीतर्फे ग्रामीण भागातील लोककला आणि लोककलावंतांना नागर रंगमंच उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. तमाशा अभ्यासक रुस्तुम अचलखांब, शाहीर बापूराव विभूते, गोंधळमहर्षी राजारामबापू कदम, चित्रकथी बाहुलेकार गणपत मसगे, परशुराम गंगावणे, पारंपरिक वाद्ये शंकरराव जाधव धामणीकर, दशावतारी कलावंत बाबी नालंग अशा अनेक लोककलावंतांचे कार्यक्रम त्यांनी मुंबईत छबिलदास सभागृहात आयोजित केले. त्यानिमित्त त्या लोककला प्रकारांवर माहितीपूर्ण पुस्तिका प्रसिद्ध केल्या. खंडोबाचे जागरण, लळीत, दशावतार, वासुदेवांची गाणी, नमन खेळे, मादळ यांसारख्या आदिवासी कला यावर अभ्यासपूर्ण पुस्तिका त्यांच्या संकल्पनेतून आयएनटीने प्रसिद्ध केल्या. खंडोबाचं लगीन, दशावतारी राजा, जांभूळाख्यान, वासुदेव सांगती, अरे रे संसार, मातीचं स्वप्न अशा आयएनटी संशोधन केंद्राच्या संशोधन नाट्यांची मूळ संकल्पना आणि लेखन मार्गदर्शन परांजपे यांचे होते. महाराष्ट्रात लोककलांच्या संशोधनाची नवी परंपरा निर्माण करून तरुण अभ्यासकांची फळी महाराष्ट्रभर उभी करण्याचे श्रेय त्यांना जाते. प्रकाश खांडगे, तुलसी बेहेरे, रमेश कुबल, गणेश हाके, सुरेश चव्हाण, पंढरीनाथ काळे, सुरेश चिखले, रामचंद्र वरक अशा तरुण अभ्यासकांची फळी त्यांनी निर्माण केली. त्यांना त्यांचा अभ्यास विषय असलेल्या लोककलांमध्ये मार्गदर्शन केले.

अशोकजी परांजपे यांचे मराठी रंगभूमीवरील योगदान नाटककार म्हणून उल्लेखनीय आहे. संत कान्होपात्रा, संत गोरा कुंभार, अबक दुबक, बुद्ध इथे हरला आहे, आतून कीर्तन वरून तमाशा, दार उघड बया सारखी संगीत रंगभूमीचे वैभव वाढविणारी नाटके त्यांनी लिहिली. नाटकांसोबतच वर्तमानपत्रात त्यांनी स्तंभ लेखन केले. अनोळखी पाऊले ही त्यांची स्तंभलेखन मालिका अतिशय प्रसिद्ध होती. लोककलांचे संशोधन, नाट्यलेखन या सोबतच ते गीतकार म्हणूनही लोकप्रिय होते. अवघे गर्जे पंढरपूर, आला आला सुगंध मातीचा, एकदाच यावे सखया, कुणी निंदावे वा वंदावे, केतकीच्या बनी तिथे, दारी उभी अशी मी, दीनांचा कैवारी, नाम आहे आदी अंती, नाविका रे, पाखरा जा दूर देशी, पैलतीरी रानामाजी, वाट इथे स्वप्नातील संपली जणू, आला आला सुगंध मातीचा अशी अनेक लोकप्रिय गीते त्यांनी लिहिली. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. लोककला संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. अशोकजी परांजपेंनी दि.९ एप्रिल २००९ रोजी त्यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली.

**!! त्यांच्या अविस्मरणीय अनेक स्मृतींना विनम्र अभिवादन !!**

- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

## ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत एच एम सुर्वे यांचे एच-५४, सेक्टर ०४, ऐरोली येथील बांधकाम नवी



मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम आज दिनांक ०७ एप्रिल २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे, जी विभाग ऐरोली येथील अधिकारी/ कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलिस पथक उपस्थित होते. सदर मोहिमेकरीता गॅस कटर, हॅमर व मजूर यांचा वापर करण्यात आलेला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## चौत्राबाई मोहन जाधव यांचे निधन



**दि.०७, मुदखेड :** मुदखेड तालुक्यातील महाटी येथीलज्येष्ठ महिला चौत्राबाई मोहन जाधव यांचे ७ एप्रिल रोजी सकाळी सात वाजताच्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरी अल्पशा:आजाराने दुःखद निधन झाले.त्या मृत्यू समयी ७५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती तीन मुलं दोन मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहेत.त्यातील त्यांचा एक मुलगा देशसेवेसाठी सैनिक आहे.त्यांच्या पार्थिव देहावर आज दि.७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता महाटी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. देशसेवेत असलेले सैनिक अनिल जाधव यांच्या त्या मातोश्री होत्या.

## डम्पिंग ग्राउंड विरोधी आंदोलनास दयानंद चोरघे यांचा पाठिंबा




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.७, पडघा (ठाणे) :** ठाणे शहराची कचरा कोंडी सोडवण्यासाठी ठाणे शहरातील कचरा भिवंडी तालुक्यातील पडघा नजीकच्या आतकोली या गावाच्या हद्दीत शासनाने दिलेल्या डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे स्थानिकांमध्ये आक्रोश निर्माण झाला असून, या डंपिंग विरोधात सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन पुकारण्यात आले आहे. डम्पिंग विरोधी स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समिती, आतकोली तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे यांच्यावतीने एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. तुम्हाला मोकळा श्वास हवा आहे का? डम्पिंग हटवा. गाव वाचवा! आतकोली डम्पिंग बंद करा, अशा घोषणा यावेळी करण्यात आल्या. हे आंदोलन सकाळी ९ वाजल्यापासून सुरु करण्यात आले होते. या आंदोलनात ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शवला. भिवंडीतील जनतेचे आरोग्य महत्त्वाचे असून या डंपिंग ग्राउंड ला काँग्रेसच्या वतीने आम्ही जाहीर विरोध करत असल्याचे यावेळी बोलताना दयानंद चोरघे यांनी सांगितले. तसेच या आंदोलनात मी शेवटपर्यंत ग्रामस्थांच्या सोबत असल्याचा शब्दही दयानंद चोरघे यांनी उपस्थित ग्रामस्थांना दिला.

## ४ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार-उपमुख्यमंत्री शिंदे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुंबई :** आजचा दिवस महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरला आहे. मुंबई मेट्रोपॉलिटन रीजन डेवलपमेंट अथॉरिटी कडून देशातील सर्वात मोठा सामंजस्य करारावर हस्ताक्षर सोहळा पार पडला. एकाच वेळी ४ लाख ७ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.जियो वल्ड सेंटर येथे आयोजित इंडिया ग्लोबल फोरम २०२५ च्या कार्यक्रमात विविध सामंजस्य करार केल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हुडकोचे अध्यक्ष संजय कुलक्षेत्र, आर.ई.सी आणि पी.एफ सीचे अध्यक्ष परमिंदर चोप्रा, आय.आर.एफ.सी चे संचालक शेली वर्मा, एन.ए.बी.एफ आय.डी चे व्यवस्थापकीय संचालक राजकीरण राय, मॅग्नम आइस्क्रीम कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित भटाचार्य, उद्योग विभागाचे सचिव पी अनबलगम आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, एमएमआरडीएने विद्युत मंत्रालयाच्या महारत्न कंपनी आरइसी लिमिटेड, पावर फाइनेंस कॉर्पोरेशन, हाऊसिंग एंड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको), इंडियन रेलवे फाइनेंस कॉर्पोरेशन, नॅशनल बँक फॉर फाइनेंसिंग इन्फ्रास्ट्रक्चर आणि डेवलपमेंट यांसारख्या कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. हे सामंजस्य करार मिनीरत्न, महारत्न आणि नवरत्न कंपन्यांसोबत केल्याने अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. हे सामंजस्य करार केल्यामुळे एमएमआर(मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन) मध्ये इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासाला गती मिळेल. गेल्या तीन वर्षांत दावोसच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये २० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत, जे एक मोठे रेकॉर्ड आहे. यावर्षी एमएमआरडीएने दावोसमध्ये साडे तीन लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करून त्याचे पालनही केले आहे. हे सामंजस्य करार मुंबई आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रातील विकासाला एक मोठे चालना देईल.

भारत आता ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर (जीसीसी) हब म्हणून उभा राहिला असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बेंगलोर, हैदराबाद, पुणे आणि गुड़गाँवमध्ये १,५०० पेक्षा जास्त जीसीसी कार्यरत आहेत. जगभरातील प्रमुख कंपन्या जसे की गूगल, अॅमझॉन,गोल्डमॅन सॅक्स आणि जेपी मॉर्गन या कंपन्यांचे जीसीसी भारतात कार्यरत आहेत. पुणे मध्ये आज एक नवीन जीसीसी सुरू करण्यात आले आहे. ज्यामुळे भारताच्या तरुणांना जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांशी काम करण्याचे संधी मिळेल. जीसीसी च्या माध्यमातून भारताची क्षमता जागतिक स्तरावर वाढवली जात आहे. भारताच्या लाखो इंजिनीअर्स, आयटी तज्ज्ञ आणि कौशल्यपूर्ण युवकांना जीसीसीमध्ये संधी मिळत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), रोबोटिक्स आणि डेटा अॅनालिटिक्स सारख्या अत्याधुनिक क्षेत्रात भारताला जागतिक नेता बनवण्याचे संधी उपलब्ध झाली आहे. एमएमआर च्या क्षेत्राला २०३० पर्यंत ३०० बिलियन डॉलरच्या जीडीपी पर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी १३५ बिलियन डॉलरचा गुंतवणूक प्राप्त करणे आवश्यक आहे. यामुळे आणखी २८ ते ३० लाख लोकांना रोजगार उपलब्ध होईल. राज्याने गेल्या ३ वर्षांत गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार केले आहे. वर्ल्ड क्लास इन्फ्रास्ट्रक्चर,कौशल्यपूर्ण मनुष्यबळ आणि मजबूत शासन यामुळे महाराष्ट्र हे आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक व्यवसायांसाठी पसंतीचे ठिकाण बनले आहे. इलेक्ट्रिक मोबिलिटी, लॉजिस्टिक्स, सेमीकंडक्टर विनिर्माण आणि एआय, हेल्थटेक, एडटेक अशा क्षेत्रात गुंतवणकीस प्रोत्साहन दिले जात आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या ५ ट्रिलियन डॉलर लक्ष्याच्या दिशेने हे सर्व उपक्रम महत्त्वाचे आहेत. जीसीसी आणि इतर व्यवसायिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबुती देत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना त्यांच्या योग्य मार्गदर्शनासाठी आणि समर्थनासाठी विशेष आभार व्यक्त करतो. त्यांच्या नेतृत्वाखाली,भारत एक प्रबळ आणि गतिमान अर्थव्यवस्था बनत आहे. आताच्या आणि भविष्यातील इन्व्हेस्टमेंटसाठी महाराष्ट्र एक खुला आणि आकर्षक प्रदेश आहे. यासाठी आपण एकत्र काम करून येत्या काळात यशस्वी होऊ शकतो.

## सायबर गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी सायबर प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करा - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** सायबर गुन्हेगारीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी सायबर गुन्ह्यांमधील तपासात सायबर प्रयोगशाळा महत्वाची भूमिका बजावणार आहे. त्यासाठी शासन प्रयोगशाळा निर्माण करीत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सायबर प्रयोगशाळांचे जाळे अधिकाधिक सक्षम करण्याच्या सूचनाही उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दक्षिण मुंबई विभागाच्या निर्भया सायबर प्रयोग शाळेचे डी. बी. नगर पोलीस स्टेशन येथे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच मुंबई (मध्य) भागासाठी वरळी पोलीस स्टेशन येथील व मुंबई (पूर्व) भागासाठी गोवंडी पोलीस स्टेशन




येथील सायबर प्रयोगशाळांचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, अप्पर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंह चहल, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती आदींसह पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबई शहरात पाच सायबर प्रयोगशाळा प्रस्तावित आहेत. यापैकी तीन प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांच्या माध्यमातून विशेषत्वाने सायबरच्या माध्यमातून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे कमी कालावधीत सिद्ध करता येणार आहे. तसेच गुन्हा लपवण्यासाठी किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी कुठल्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणातील डाटा डिलीट केल्यास, मोबाईलची तोडफोड केल्यास किंवा मोबाईल टेम्पर केल्यास अशा सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील सर्व डेटा आधुनिक संगणक प्रणालीच्या सहाय्याने 'रिकव्हर' केला जाणार आहे. प्रयोगशाळा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून अद्ययावत संगणक प्रणालीने (सॉफ्टवेअर) सक्षम आहेत.

जगातील या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान या प्रयोगशाळांमध्ये उपयोगात आणले जाणार आहे. आर्थिक गुन्हेगारी संदर्भात ऑनलाईन पद्धतीने परस्पर पैशांची हेराफेरी करणे, बँक खाते हॅक करणे अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवरही प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय वरिष्ठ डॉजबॉल स्पर्धेत मुंबई संघाला तृतीय क्रमांक

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०८, मुंबई :** कर्नाटकातील पूरण येथील साऊथ एशियन ट्रस्ट इन्स्टिट्यूट येथे अलीकडेच पार पडलेल्या १७व्या राष्ट्रीय वरिष्ठ डॉजबॉल स्पर्धेत मुंबईच्या मुलांच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला.

तृतीय क्रमांकासाठी झालेल्या निर्णायक सामन्यात मुंबई संघाने बिहारवर १० गुणांनी मात करत विजयी ठरला आणि स्पर्धेतील आपले स्थान भक्कम केले. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील २४ राज्यांचे मुलांचे आणि २० राज्यांचे मुलींचे संघ सहभागी झाले होते, ज्यामुळे स्पर्धेची प्रतिष्ठा अधिकच




वाढली. मुंबई संघाच्या विजयाबद्दल भारतीय डॉजबॉल महासंघाचे महासचिव डॉ.पी.एस.बरार, हाय पॉवर कमिटीचे सदस्य डॉ.जी.पी.पाल व ख्वाजा अहमद,तसेच मुंबई डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद (दादा) प्रभु, ऐश्वर्या (ताई) शेटे आणि सचिव जगदीश अनचंन यांनी संघाचे मन:पूर्वक अभिनंदन केले. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी प्रथम गुप्ता व प्रतिक पाखरे हे मुंबईतून डॉजबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. ज्यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**मुंबई मुलांचा विजयी संघ...**

आंतरराष्ट्रीय खेळाडू नरेश राऊत, ललित नवाळी, विनायक देवकर, मनीष विश्वकर्मा, मोहित द्यावत्त, आदित्य सिंह, राज बदी, प्रणीत पाटील, उज्ज्वल त्रिपाठी, कृष्णा कोंडाळ, संप्रित पुजारी.

## येडेश्वरी देवस्थानाला ब दर्जा तरीही निधी अभावी विकासापासून वंचित

### श्री. येडेश्वरी देवस्थान म्हणजे अवघ्या राज्यात आराध्य दैवत म्हणून प्रसिद्ध; राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी यात्रा



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०८, कळंब (धाराशिव) :** येरमाळा येथील श्री येडेश्वरी मंदिर देवस्थानाला प्रशासनाच्या तीर्थक्षेत्र दर्जाच्या यादीत ब दर्जा असूनही शासनाचा आतापर्यंत ब दर्जानुसार कोणताही निधी मिळत नाही. तीन मार्चला झालेल्या यात्रा नियोजन बैठकीत देवस्थान व दर्जा असून निधी मिळत नसेल तर देवस्थान कोणत्या तीर्थक्षेत्र दर्जाच्या कोणत्या वर्गात आहे याची अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली होती.

०१ मार्चला श्री येडेश्वरी देवी चैत्र पौर्णिमा यात्रेची आढावा बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तेव्हा हा मुद्दा पुन्हा उपस्थित झाल्याने देवस्थान ब दर्जा वर्गात असल्याचे निश्चित झाले असून यापुढे देवस्थानला निधी मिळावा.

यासाठी देवस्थान ट्रस्ट, ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासन काय उपाययोजना करणार याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.श्री. येडेश्वरी देवस्थान म्हणजे अवघ्या राज्यात आराध्य दैवत म्हणून प्रसिद्ध आहे. देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा म्हणजे राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी यात्रा मानली जाते.

या यात्रेला, देवस्थानला राज्य शासनाचा कोणताच निधी मिळत नसल्याने ग्रामपंचायत यात्रेत दाखल होणाऱ्या व्यावसायिकांच्या व्यवसाय करावर ३-४ लाख रुपयांत यात्रेचा खर्च भागवताना ग्रामपंचायतची दमछाक होते. मंदिर ट्रस्टला ही कोणताच निधी मिळत नसल्याने मंदिर परिसरात भाविकांना भक्तनिवास, स्वच्छतागृह अशा सुविधा उपयुक्त प्रमाणात देता येत नाहीत.

पहिल्या यात्रा नियोजन बैठकीत पत्रकार दत्ता बारकुल यांनी देवस्थानाला तीर्थक्षेत्र ब वर्ग दर्जा असूनही निधी मिळत नसेल तर देवस्थानला नेमका कोणत्या वर्गाचा दर्जा आहे. दरवर्षी यात्रेच्या सोई सुविधा देण्यासाठी निधी मिळविण्यासाठी स्थानिक प्रशासनाला धडपड करावी लागते. देवस्थान व दर्जा वर्गात असेल तर निधी का मिळत यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे असे सूचित केले होते.

दुसऱ्या झालेल्या आढावा बैठकीत ही त्यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याने देवस्थानला तीर्थक्षेत्राचा ब दर्जा असल्याचे निश्चित झाले असून ग्रामपंचायतची अनेक दिवसांपासूनची माळेगाव खंडोबा यात्रेप्रमाणे येडेश्वरी देवीच्या यात्रेला निधी मिळावा अशी असलेली मागणी मार्गी लागेल का. जिल्हाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे देवस्थानाच्या विकासाला केव्हा गती मिळेल, असे प्रश्न ग्रामस्थांमध्ये निर्माण होत आहेत.

**यात्रेचे स्वरूप**

श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेला पंधरा लाख भाविक येतात. राज्याच्या पुणे, मुंबई, कोल्हापूर, सातारा अशा अनेक जिल्ह्यासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेशातील भाविक मोठ्या प्रमाणात येतात. यात्रेकरूंना सोई सुविधा पुरवण्यासाठी जिल्हा प्रशासनावर ताण पडतो.

**विकासात्मक उंची वाढावी यासाठी मी प्रयत्नशील**

येडेश्वरी यात्रा आढावा बैठकीत यात्रेला पशुप्रदर्शन, कुस्त्यांसाठी जिल्हा सेस निधीतून मिळणारा निधी बंद झाला आहे. तो मिळावा शिवाय श्री येडेश्वरी देवस्थान भाविकांच्या श्रद्धेमुळे जेवढे प्रसिद्ध आहे त्या तुलनेत प्रशासकीय स्तरावर येडेश्वरी यात्रेची, देवस्थानाची विकासात्मक उंची वाढावी यासाठी मी प्रयत्नशील राहीन.

**– कीर्ती किरण पुजार, जिल्हाधिकारी, धाराशिव**

## अपात्र शिधापत्रिका रद्द होणार; अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून ३१ मे पर्यंत शोध मोहीम चालणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने जिल्ह्यातील अपात्र शिधापत्रिका (रेशनकार्ड) रद्द करण्यासाठी शोधण्यासाठी १ एप्रिलपासून विशेष शोधमोहीम हाती घेतली आहे. संपूर्ण एक महिना चालणाऱ्या या मोहिमेत बोगस शिधापत्रिका धारकांची छाननी केली जाणार आहे.

यामध्ये विशेषतः बांगलादेशी घुसखोर यांसह कोणत्याही विदेशी नागरिकांना रेशनकार्ड दिल्याचे आढळल्यास ते रद्द केले जाणार आहे. विभागाने नुकताच याबाबतचा आदेश जारी केला. हि शोधमोहीम २ महिने म्हणजे २१ मे २०२५ पर्यंत चालणार आहे. मोहीम राबविण्याची जबाबदारी दुकानदारांकडे मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी रेशन दुकानदारांना केंद्रबिंदू ठरवण्यात आले आहे. ग्राहकांना नमुना फॉर्म हे दुकानदार विनामूल्य पुरवतील. फॉर्मसह वर्षभराच्या वास्तव्याचा पुरावा अनिवार्य असून, एकूण ११ प्रकारांतील कोणताही एक अधिकृत दस्तऐवज सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

पुरावा न दिल्यास कार्ड रद्द होणार वास्तव्याचा पुरावा सादर न केल्यास ग्राहकांना १५ दिवसांची मुदत दिली जाणार आहे. मुदतीत पुरावा न दिल्यास संबंधिताचे रेशनकार्ड रद्द होईल. त्यासाठी हमीपत्र ही आवश्यक असून, ते सादर केल्यानंतर ग्राहकाला पावती दिली जाईल. 'अ' आणि 'ब' गटात अर्जांचे वर्गीकरण छाननीदरम्यान सादर करण्यात आलेल्या पुराव्यावर आधारित अर्जांची दोन गटांमध्ये विभागणी होणार आहे.

'अ' गटात सर्व कागदपत्रे पूर्ण असलेले अर्ज समाविष्ट होतील आणि त्या ग्राहकांचे रेशनकार्ड पूर्ववत राहील. तर 'ब' गटात अपूर्ण माहिती असलेले अर्ज टाकण्यात येतील आणि त्यांच्यावर पुढील कार्यवाही केली जाईल. लागणारे पुरावे भाडे करारनामा, निवासस्थानाचे मालकी हक्काचे कागदपत्र, गॅस कनेक्शन बिल, बँक पासबुक, वीज टेलिफोन मोबाईल बिल, ड्रायव्हिंग लायसन्स, कार्यालयीन ओळखपत्र, मतदार ओळखपत्र आणि आधार कार्ड या पैकी कोणत्याही एका पुरावा ग्राह्य धरला जाणार आहे.

**कारवाईसाठी प्रशासन सज्ज बोगस रेशन कार्डमुळे खऱ्या गरजूंचा हक्क हिरावला जात असल्याने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह फर्म लवकरात लवकर सादर करावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी केले आहे.**

## मुख्यमंत्र्यांसह संबंधित विभागांसमवेत चर्चा करून राज्यातल्या शेतरस्त्यांचा प्रश्न सोडवणार - खासदार भोसले

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०८, सुपा (अहिल्यानगर)** : महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने शेतरस्त्यांच्या प्रश्नावर दिनांक २१ एप्रिल व २२ एप्रिल २०२५ रोजी मुंबई आझाद मैदान येथे होणाऱ्या आंदोलना संदर्भात खासदार श्रीमंत उदयनराजें भोसले यांची जलमंदिर पॅलेसवर महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे या समवंत चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यभरातील शेतकऱ्यांचा शेतरस्त्यांचा चाललेला संघर्ष त्यावर शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून राज्यभर शेत तिथे रस्ता व गाव तिथे समृद्धी अभियान, जनजागृती, जनआंदन उभारत संवेदनशिल प्रश्नाकडे राज्य सरकारचे प्रश्नासनाचे लक्ष वेधण्याचे काम राज्यभर सुरू आहे.

यासंदर्भात निवेदन देत मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाची माहिती दिली यावेळी राजेंनी तातडीने महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या निवेदनाची दखल घेत सातारा जिल्हाधिकारी यांना तातडीने सातारा जिल्हातील शेतरस्त्यांच्या हद्द निश्चित करण्याच्या सूचना केल्या व आंदोलानातील सर्व शिव पानंद शेतरस्त्यांच्या सरसकट हद्द निश्चित कराव्यात, वहिवाटीच्या रस्त्यांना गाव नकाशावर घ्यावे.

तहसिल प्रांत कार्यालयामध्ये प्रलंबित रस्ता केसेस तातडीने निकाली काढाव्यात, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी , शेतकऱ्यांना मोफत शेतरस्ते देण्याची घोषणा देण्यापेक्षा प्रत्यक्ष कालावधी जाहीर करून मागेल त्याला दर्जेदार शेतरस्ता द्यावा. अशा विविध मागण्या कायदा करून शेतरस्ते कालावधीत पूर्ण करण्याचे जाहीर करावे आदी मागण्यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांसह संबंधित विभागांसमवेत चर्चा करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचे आश्वासन महराष्ट्र शिवपानंद चळवळीच्या पदाधिकाऱ्यांना दिले.



शेतरस्त्यांच्या दिनांक २१, २२ एप्रिलच्या आझाद मैदान आंदोलनाची खासदार उदयनराजे भोसले यांनी दखल घेत केलेली तातडीच्या कार्यवाहीने शेतकरी भारावुन गेले. नक्कीच राज्यातील एकही शेतकरी भाऊ शेतरस्त्या पासून वंचित राहणार नाही. असा विश्वास राजांच्या कार्यवाहीमुळे झाला आहे.

**- शरद पवळे/ दादासाहेब जंगले पाटील (महाराष्ट्र सज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळ)**

यावेळी महाराष्ट्र शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, सुरेश वाळके, सचिन शेळके, रविदादा पाटील यांसह चळवळीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी एआय तंत्रज्ञानाची पंढरपूरात चाचणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** पंढरपूर महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. तसेच आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला लाखो भाविक पंढरीत येतात. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र, भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग , प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात वारकरी- भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी आज पंढरपूर बस स्थानक येथून घेण्यात आली.

वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची चाचणी आज पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय. पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले,



ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते.श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानाच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे. कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते.

आता प्रत्येक वर्षी होणाऱ्या सोहळ्यात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए.आय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आर्शीवाद, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे. या तंत्रज्ञानाव्दारे गर्दीचे प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे. चेहऱ्याची ओळखी द्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेले लोकांची माहिती, ऑब्जेक्ट शोधणे त्यांच्या हालचालींचे विश्लेषण देखील करता येईल.

गर्दीची वाढलेली घनता लक्षात येताच तत्काळ सूचना मिळेल व त्या ठिकाणी सुरक्षेबाबत उपाययोजना राबवता येतील असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली. वारी कालावधीतील गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या एक वर्षापासून प्रशासनातील अधिकारी एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत संशोधन करत होते.

त्याबाबतची चाचणी आज घेण्यात आली. एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार असून एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्दी मोजणे, व्यवस्थापन करणे सोपे होणार असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी सांगितले.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून 'आषाढीवारी' पूर्वतयारीचा आढावा

### रस्ते व पालखीतळ दुरुस्तीचे प्रस्ताव दोन दिवसात सादर करण्याचे केले आवाहन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासह पालखी मार्गावरील रस्ते, पालखीतळ दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव दोन दिवसांत सादर करा. पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या अडचणीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याच्या कामांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आषाढीवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, अपर आयुक्त अरुण आनंदकर, उपायुक्त विजय मुळीक, नितीन माने, दत्तात्रय लांघी, तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक उपस्थित होते. मंत्री श्री. गोरे म्हणाले, प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग व विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल याची विशेष खबरदारी घ्यावी.

स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. टँकरमधील पाण्याच्या शुद्धतेबाबत नियमित तपासणी करावी. पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरणही निटपणे होईल याकडे लक्ष द्यावे. पालखी मार्गावरील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांची स्वच्छता व अन्न शुद्धतेची खात्री करावी.

तसेच पंढरपूर शहरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करावी, पंढरपूर शहरात सोलापूर जिल्हा परिषद व पोलीस प्रशासनाने ड्रोनद्वारे नियंत्रण ठेवण्यासाठी संयुक्त व्यवस्थापन यंत्रणा तयार ठेवावी, वारीदरम्यान देण्यात आलेल्या कामांसाठी कंत्राटदारांकडून



अटी व शर्तीचे पालन करुन कामे होण्यासाठी त्यांच्यावर शासकीय यंत्रणेने अंकुश ठेवावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. ग्रामपंचायतींना आगाऊ निधी देण्याची व्यवस्था करण्यात येईल असे सांगून पालखी सोहळ्यादरम्यान पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील श्री.गोरे यांनी दिली.विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली.

स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी, प्रथमोपचार पेट्या, निवारा केंद्र, हिरकणी कक्ष आदी सुविधांसोबत वारकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगून स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी सर्व विभागांनी समन्वय ठेऊन दिलेल्या सूचनांचे पालन करावे तसेच स्थानिक प्रशासनाशी समन्वय ठेऊन पोलीस वाहतूक विभागाने पाण्याचे टँकर पालखी तळ व विसाव्याच्या ठिकाणी वेळेत पोहोचतील याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी मंत्री श्री. गोरे यांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने सर्वच जिल्ह्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली.

## राष्ट्रीय भूमि अभिलेख दिनानिमित्य मार्गदर्शन शिबीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, बुलडाणा :** राष्ट्रीय भूमापन दिन निमित्त उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयामार्फत बुधवार, दि.०९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ई- फेरफार, ई-मोजणी व्हर्जन-२, नकाशाचे डिजीटायझेशन, ई-चावडी, रोव्हर तंत्रज्ञानाव्दारे मोजणी अशा विविध सुविधासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिराचा नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय यांचेकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन
जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा

भूमि अभिलेख विभाग हा मुख्यतः जमिनीची मोजणी करणारा विभाग म्हणून ओळखला जातो. राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमातंर्गत भूमि अभिलेख विभागाने आपल्या सर्व सेवा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून लोकाभिमुख सहज व जलद गतीने सर्व नागरीकांना उपलब्ध करुन दिल्या आहेत. या सुविधांचा नागरिकांनी लाभ घ्यावा.

# थोडक्यात

## महावीर जयंतीनिमित्त गुरुवारी कत्तलखाने व मांसविक्री बंद ठेवण्याचे आदेश

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०८, कल्याण (ठाणे) :** महावीर जयंतीच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सर्व कत्तलखाने व मांसविक्रीस गुरुवार, दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. हा निर्णय जनतेच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन आणि संबंधित प्रशासकीय ठरावाच्या आधारे घेण्यात आला आहे. महापालिकेने स्पष्टपणे सूचित केले आहे की, बुधवार, दिनांक ०९ एप्रिल २०२५ रोजी च्या रात्री १२ वाजल्यापासून ते गुरुवार, दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी च्या रात्री १२ वाजेपर्यंत कोणत्याही प्रकारच्या प्राण्यांची कत्तल अथवा मांसविक्री करता येणार नाही. यासंदर्भात कोणतीही उल्लंघने झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३४, ३३६ व ३७६ (अ) अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. त्यानुसार, सर्व खाटीक/ कसाई, अधिकृत व अनधिकृत परवाना धारक मांस विक्रेत्यांनी या सूचनेची गंभीर दखल घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## घर घर संविधान योजना राबवले जाईल - मिरा भाईंदर आयुक्त



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता कॉन्फरन्स हॉलमध्ये पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी घर संविधान हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याच्या उपक्रमास प्रतिसाद म्हणून मिरा भाईंदर शहरात संविधान प्रस्तावनाची वाटप करण्यासाठी नियोजन करणार. तसेच पत्रकारामुळे आम्हाला शहरात काय होते. त्याची माहिती मिळते पत्रकारांचे कौतुक केले. आयुक्त राधा मोहन शर्मा नी प्रेस कॉन्फरेन्स घेऊन येणाऱ्या काही उपक्रमाची माहिती दिली.

## जलसुरक्षा कायद्याविरोधात महाबळेश्वर तालुका ओ.बी.सी. संघटना आक्रमक



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर (सातारा)** : निर्भिड पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर देखील गदा येण्याचा धोका महाराष्ट्र सरकारने जनसुरक्षा कायद्याच्या नावाखाली लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संघटनेने निवेदनाद्वारे केला आहे. या कायद्याचा सर्वाधिक फटका परखडपणे संविधानीक पद्धतीने स्वतंत्र विचार व्यक्त करणाऱ्या पत्रकार, संघटना तसेच व्यक्तींना बसणार असल्यामुळे तालुका ओ.बी.सी.संघटनेने ठामपणे विरोध दर्शविला आहे. संविधानाचे उल्लंघन? या विधेयकामुळे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येणार असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. कायद्यात अस्पष्ट संज्ञा आणि व्यापक व्याख्या वापरल्याने प्रशासनाला व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचे अधिकार मिळणार आहेत. त्यामुळे या कायद्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि वैचारिक दडपशाहीसाठी केला जाऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. विधेयकामुळे उद्भवणाऱ्या समस्यांमध्ये नागरिकांना सरकारच्या धोरणांवर टीका करण्यास किंवा मत मांडण्यास अडथळा निर्माण होईल. सामाजिक संघटना व एनजीओच्या वैध आंदोलनांवर निर्बंध येऊ शकतात. विविक्षित बेकायदेशीर कृत्ये ही संकल्पना स्पष्ट नसल्याने प्रशासनाला अमर्याद अधिकार मिळतील, ज्यामुळे मुलभूत अधिकार धोक्यात येतील.लोकशाही मूल्यांवर परिणाम होईल आणि नागरिकांचा सरकारला प्रश्न विचारण्याचा हक्क मर्यादित केला जाईल.विधेयक मागे घेण्याची मागणी या विधेयकामुळे राज्यातील नागरी हक्क आणि लोकशाही मूल्यांवर गंभीर परिणाम होईल, असा इशारा देत महाबळेश्वर तालुका ओ.बी.सी.संघटनेच्या वतीने मा.जिल्हाधिकारी, संतोष पाटील यांना तालुका अध्यक्ष, अनिल लोहार यांनी निवेदन सादर केले आहे. त्यांनी निवेदनाद्वारे सरकारला आणि विधानमंडळ समितीला हे विधेयक त्वरित रद्द करण्याची मागणी केली आहे. यावेळी त्यांच्या समवेत संघटनेचे पदाधिकारी राजेंद्र धोत्रे, सुनील यादव, विजय गोरे व संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा - केंद्रीय राज्यमंत्री आठवले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, बुलडाणा :** केंद्र व राज्य शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा. गरजूवंत लाभार्थी योजनाचा लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता संबधितानी घ्यावी, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. सामाजिक न्याय विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व शासनाच्या योजनांचे आढावा बैठक शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी केंद्रीय राज्यमंत्री श्री. आठवले बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, केंद्र सरकारच्यावतीने अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीय, जेष्ठ नागरीक, दिव्यांग यांच्या सबलीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनेचा लाभ प्रत्येक गरजू लाभार्थ्याला मिळण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन या योजनेबाबत समाजात माहिती उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना या योजनेचा लाभ मिळू शकेल. अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात चांगल्या सुविधा उपलब्ध करुन वसतीगृहाची क्षमता वाढविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याचे सूचना श्री. आठवले यांनी दिले.

या बैठकीत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, अनुसूचित जाती उपयोजना, शिष्यवृत्ती योजना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन योजना, वृद्धाश्रम योजना, संजय गांधी निराधार योजनांचा यावेळी आढावा घेतला.